**प्रेसनोट** दि. १६/११/२०१७

## सामान्य गुंतवणूकदारांना त्यांचे गुंतवणुकीचे पैसे आर्थिक गुन्हे शाखेच्या प्रयत्नाने परत मिळाले

ठाण्यातील जांभळी नाका भागातील नारायण दास ठक्कर याचे किराणामालाचे दुकान होते. आफ्रिकेतील देशांत औषध पुरवठयाचा व्यवसाय असुन लवकरच त्यासाठी एक कंपनी स्थापन करणार असल्याचे ठक्कर दुकानात येणाऱ्या गिऱ्हाईकांना सांगत असे. कंपनीत गुंतवणूक केल्यास महिन्याकाठी दोन टक्के व्याजाचे अमिषही त्याने दाखविले होते. त्याला भुलून ठाण्यातील सुमारे ३२५ गुंतवणूकदारांनी तब्बल १० कोटी रूपये ठक्करकडे दिले होते. १९९८–९९ साली आकर्षक व्याजाची ही योजना सूरू झाल्यानंतर गुंतवलेल्या पैशातूनच पुढील दोन टक्के व्याजाची रक्कम ठक्कर देत होता मात्र, वारंवार पाठपुरावा केल्यानंतरही व्याजासह मुळ गुंतवलेली रक्कमही ठक्कर देत नसल्याचे लक्षात आल्यानंतर २००२ साली याप्रकरणी ठाणे नगर पोलीस ठाणे गु.र.नं १९५/०३, भादवि कलम ४२०, ३४ व MPID Act ३, ४ प्रमाणे तक्रार दाखल झाली होती. ठाणे पोलीसांच्या आर्थिक गुन्हे शाखेचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरिक्षक अजित देशमुख आणि संजीव जॉन यांच्या पथकाने अत्यंत बारकाईने या प्रकरणचा छडा लावत न्यायालयीन आघाडीवरही गुंतवणुकदारांची बाजू ठोसपणे मांडली. ठक्कर याला अटक झाल्यानंतर त्याचा जामीन मंजूर होत नव्हता. वडीलोपार्जित मालमत्ता विकून गुंतवणूकदारांचे पैसे देऊ असे प्रतिज्ञापत्र ठक्कर याने दिल्यानंतर ठाणे न्यायालयाने जामीन मंजूर केला. मात्र कारागृहातून सुटल्यानंतरही ठक्करने पैसे देण्यास टाळाटाळ केल्यामुळे ठाणे पोलीसांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तिथे ठक्करचे प्रतिज्ञापत्र पोलीसांनी सादर केल्यानंतर न्यायालयाने कठोर भूमिका घेत ठक्करच्या मालमत्तेच्या लिलावाचे आदेश दिले. त्याच्या मालमत्तेची कागदपत्रे पोलीसांच्या लॉकरमध्ये ठेवण्यात आली होती. न्यायालयाच्या आदेशाने ठक्कर याच्या मालमत्तेचा लिलाव झाला असून त्यातून मिळालेले पैसे गुंतवणूकदारांना परत दिले जात आहेत. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय येथे झालेल्या कार्यक्रमात रकमेचे वाटप करण्यात आले आहे. न्यायालयाच्या आदेशाने पहिल्या ४० गुंतवणूकदारांना त्यांच्या गुंतवणूकीच्या ७५ टक्के रकमेचे वाटप झाले असून ५८ जणांना कागदपत्राची पूर्तता केल्यानंतर पैसे मिळतील, असा विश्वास लढा देणाऱ्या रणजित चित्रे यांनी व्यक्त केला आहे.

सदर प्रकरणात तत्कालीन तपासी अधिकारी वरिष्ठ पोलीस निरिक्षक अजित देशमुख आणि पोलीस निरीक्षक संजीव जॉन यांनी न्यायालयात खटला चालू असताना पाठपुरावा केल्यामुळे गुंतवणुकदारांना त्यांची रक्कम परत मिळाली आहे. अशा प्रकारे गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत मिळण्याचा हा महाराष्ट्रातील पहिलाच प्रसंग असावा. यामुळे सामान्य लोकांनाही पोलीसांच्या कार्यपध्दतीबद्दल विश्वास निर्माण झालेला आहे




पोलीस आयुक्तालय, ठाणे




महाराष्ट्र
IMG_1981.JPG (5184 x 3456)




पोलीस आयुक्तालय, ठाणे


सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
पोलीस आयुक्तालय, ठाणे